# शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद

**Government Polytechnic, Tuljapur, Road,**

**Osmanabad – 413 501 (Maharashtra**

E-mail principal.gposmanabad@dtemaharashtra.gov.in , osd_gpobad@rediffmail.co


जा.क्र.शातंनिउ/आस्था-२/२०१८/ 2734

दिनांक :- 12 NOV 2018

## जाहीर निविदा

शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद या संस्थेच्या परीसरातील सर्व इमारतींचे, मुख्य इमारत, नवीन संगणक इमारत, कर्मशाळा इमारत, मुलांचे व मुलींचे वसतिगुह व अधिकारी व कर्मचारी यांचे निवासस्थाने या इमारतीचे आगी पासून संरक्षण होण्याकरीता फायर ऑडीट करण्याकरीता महाराष्ट्र अग्नीशमन सेवा संचालनालय मुंबई यांच्या कार्यालया मार्फत लायसन्स प्राप्त अभिकरण म्हणून काम करण्याकरीता प्राप्त असलेल्या नोंदणीकृत संस्था किंवा कंपनी कडून या संस्थेचे फायर ऑडीट करण्याकरीता दरपत्रक **दोन बंद लिफाफा पध्दतीने** स्वतंत्र मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सिलबंद पाकीटात दि.१३/११/२०१८ ते ३०/११/२०१८ पर्यत रोख रु. १०००/- (एक हजार रुपये) भरुन सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत द्याव्यात. इच्छुक परवाना धारकाने इमारतीचे ऑडीट करण्याचे दर सादर करण्यापुर्वी या संस्थेला प्रत्यक्ष भेट देवून इमारतींचे पाहणी करून दर भरावे.

तसेच निविदा फॉर्म भरणे संबधी च्या अटी व नियम तसेच संस्थेतील इमारतींचे नाव व Block no. & layout map (नकाशा) इत्यादी सर्व माहीती या संस्थेच्या संकेतस्थळावर **www.gposmanabad.org** यावर उपलब्ध आहे.

(डॉ.एन.एस.लिंगायत)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,उस्मानाबाद.

## निविदा भरणे करीता सर्व साधारण अटी व शर्ती.

१) कंत्राटदाराने निविदा अर्ज **दोन लिफाफा पध्दतीने** मोहोरबंद लिफाफयात सादर करावेत. तसेच ज्या निविदा/दरपत्रके तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरतील त्यांच्याच वाणिज्यिक निविदा उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) **त्यापैकी एका लिफाफयात** (तांत्रिक लिफाफा) कंत्राटदाराने त्यांच्या कंपनीचे / संस्थेचे नोंदणी प्रमाण पत्र, लायसन्स प्राप्त अभिकरण परवाना, सेवा कराचे प्रमाणपत्र, मागील ३ वर्षाचे आयकर प्रमाणपत्र, जी.एस.टी. क्रमाक, पॅनकार्ड, ई.एस.आय.सी. प्रमाणपत्र, पी.एफ. प्रमाणपत्र, प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र या सर्व प्रमाण पत्राची कालावधी वैध असल्याचे छायांकीत प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास निविदा अर्ज निविदा प्रकीयेतून बाद ठरविण्यात येईल.

३) **व दुसरा लिफाफयात** (वाणिज्यिक लिफाफा) कंत्राटदाराने निविदा अर्ज सादर करावे ज्यामध्ये इमारतीचे फायर ऑडीट करण्याचे कमीत कमी दर सादर असावेत.

४) संस्थेतील सर्व इमारती करीता दिलेले एकुण ऑडीटचे दर विचारात घेवून कमीत कमी दर असलेल्या परवाना धारकाचे निविदा मंजूर करण्यात येईल.

५) निविदा भरते वेळी प्रति अर्ज रू.५०००/- अनामत रक्कम प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद यांच्या नावे स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा उस्मानाबाद येथे देय असलेला (Payble at Osmanabad) एस.बी.आय. धनाकर्ष (Demand Draft) जमा करावा लागेल. निविदा मंजूर न झाल्यास तो धनाकर्ष (Demand Draft) परत केला जाईल. तथापी मंजूर होऊनही इमारतीचे फायर ऑडीट चे काम न केल्यास सदर डिमांड डॉप्ट (D.D.) ची रक्कम शासन जमा केली जाईल.

६) कोरे निविदा अर्ज रू.१०००/- प्रती अर्ज, संस्थेच्या रोखपाल कडे जमा करून हस्तगत करावे. व ती रक्कम ना परतावा असेल.

७) इमारतीचे फायर ऑडीट चे कमीत कमी दर दर्शविलेले दरपत्रक, अटी व शर्ती मान्य असल्याचे नमुद करून **दोन लिफाफा पध्दतीने मोहोरबंद लिफाफयात** प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद. पिन कोड ४१३५०१ यांचे नावे व पत्तावर दिं.३०/११/ २०१८ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयाच्या निविदा बॉक्स मध्ये कार्यालयीन अधिकारी अथवा कर्मचारी यांचे समक्ष टाकावे .

८) वरील निविदात बदल ( कमी / जास्त) होऊ शकेल याबाबतचे व निविदा स्विकारणे अथवा मंजूर करण्याचे सर्वस्वी अधिकार प्राचार्यांना राहतील.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद.


LOCATION PLAN
REFERENCE
RESIDENSIAL QUARTERS
New Bdg
New Bdg
New Bdg.
A
B
C
D
E
F
G
H
I
J
K
L
M
N
O
P
Q
6.00 M WIDE ROAD
6.00 M WIDE ROAD
5.00 M WIDE ROAD
7.00 M WIDE ROAD
PROPSED WORKSHOP
WORK SHOP
PARKING
REVISIONS
OFFICE OF THE DEPUTY.
ARCHITECT TO GOVT.
P.W. DEPTT. M. STATE.
AURANGABAD.

शासकीय तंत्रनिकेतन,उस्मानाबाद
GOVERNMENT POLYTECHNIC, Tuljapur Road, Osmanabad
TEL NO. 251745, Fax No.02472-251013
E-Mail : osd_gpobad@rediffmail,com

जा क.शातंउ/स्थापत्य/2017/2796 दिनांक : 9 NOV 2017

**परीपत्रक**

विषयः–इमारतीच्या Block Numbering करणे बाबत.

संदर्भः–मा. प्राचार्य यांच्या कक्षात दि. 6/11/2017 रोजी झालेल्या सर्व विभागप्रमुखांसोबतच्या बैठकीतील विषय व चर्चा.

संस्था परीसरात शैक्षणिक/निवासी लहान मोठया 17 इमारती आहेत. सदर इमारतीच्या देखमाल दुरूस्ती संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधणे व सदरील इमारतीच्या दुरूस्ती करणे बाबतीत पत्रव्यवहार सुलभ होण्यासाठी सदरील इमारतींना खालीलप्रमाणे Block Numbering करण्यात येत आहे.

शैक्षणिक/निवासी इमारतींचा तपशील

| Sr. No. | Block No. | Building Description | Floor |
|---|---|---|---|
| 1 | A | Main Academic Building (Office, Civil Dept., Mech Dept., E&TC, Auto, Sci, Library, etc.) | Ground Floor + 2 |
| 2 | B | Computer Dept. & DDGM Dept. Building (Extension bldg.) | Ground Floor + 1 |
| 3 | C | Workshop Building | Ground Floor |
| 4 | D | Boys Hostel | Ground Floor + 2 |
| 5 | E | Rector quarter (Rajgad) | Ground Floor |
| 6 | F | Principal Quarter (Shivneri) | Ground Floor |
| 7 | G | Girl Hostel (96 capacity) | Ground Floor + 1 |
| 8 | H | Girl Hostel (old) (48 capacity) | Ground Floor |
| 9 | I | Girl Hostel (50 capacity) | Ground Floor + 2 |
| 10 | J | Staff Quarter (Raigad Building) | Ground Floor + 3 |
| 11 | K | Staff Quarter (Sinhgad Building) | Ground Floor + 3 |
| 12 | L | Staff Quarters (HOD quarter) | Ground Floor |
| 13 | M | Staff Quarters (HOD quarter) | Ground Floor |
| 14 | N | Staff Quarters | Ground Floor + 3 |
| 15 | O | Staff Quarters | Ground Floor + 3 |
| 16 | P | Staff Quarters | Ground Floor + 3 |
| 17 | Q | Staff Quarters | Ground Floor + 3 |

इमारती संदर्भात अडीअडचणी/देखभाल दुरूस्ती इत्यादी बाबतीत पत्रव्यवहार करताना इमारतीचा Block No. व इमारतीचे नाव याचा उल्लेख करावा.

सोबतः– संस्थेचा Lay out plan block no. सह.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,
उस्मानाबाद

प्रतः–सर्व विभागप्रमुख Civil/Mech/Auto/Computer/E&TC/DDGM/Science /कार्यालय/वसतीगृह/ कर्मशाळा व कुलमंत्री यांना माहितीस्तव.